# कोविड-19
# गैरसमजुती आणि तथ्ये

PraDigi
PRATHAM DIGITAL

| गैरसमज | तथ्य |
| --- | --- |
| मला कोविड-19 हा आजार होऊन गेला आहे. त्यामुळे मला लस घेण्याची गरज नाही. | आतापर्यंतच्या पुराव्यांनुसार असे लक्षात आले आहे की ज्यांना कोविड-19 होऊन गेला आहे, त्यांनाही लस घेतल्याने फायदाच होतो. पण तुम्ही कोविड-19 मुळे आजारी असाल किंवा तुमची टेस्ट पॉजिटिव्ह आली असेल तर लगेचच लस घेणे टाळा. पूर्ण बरे झाल्यावर 3 महिन्यांनी तुम्ही लस घेतली पाहिजे. याबाबत काही शंका असतील तर तुमच्या डॉक्टरांशी संपर्क करा. |
| कोविड-19 ची लस घेऊन झाली की मास्क घालायची गरजच नाही. | जोपर्यंत समाजातील जास्तीत-जास्त लोकांमध्ये या आजाराविरुद्ध प्रतिकारक्षमता तयार होत नाही, तोपर्यंत मास्क लावणे, हात धुणे आणि सार्वजनिक ठिकाणी एकमेकांमध्ये शारीरिक अंतर ठेवणे या गोष्टी अतिशय महत्वाच्या आहेत. |



